मदत व पूनर्वसन विभागाच्या नावात 'आपत्ती व्यवस्थापन' नाव अंतर्भुत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूनर्वसन)

शासन परिपत्रक क्रमांक : आव्यप्र-२०१७/प्र.क्र.(३११/१७)/आव्यप्र-१,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक - २८ जून, २०१९

परिपत्रक :-

राज्यामध्ये येणाऱ्या आपत्तीपासुन मानवी व आर्थिक नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने, आपत्ती संदर्भात आपत्तीपूर्व जागरूकता निर्माण करणे, आपत्तीचे न्यूनीकरण, पुनर्वसन व पुनर्बांधणी करणे याबाबी अंतर्भूत करुन स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन कक्ष निर्माण करण्यात आला आहे. .

मदत व पुनर्वसन विभागाच्या नावात आपत्ती व्यवस्थापन नाव अंतर्भूत करणेबाबत विभागातर्फे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २४ मे २०१९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करून महसूल व वन विभागाला नेमून दिलेले विषय या शीर्षाखाली "मदत व पुनर्वसन" या उपशिर्षाऐवजी "आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन" विभाग असे करण्यात आले आहे.यापूढे मदत व पुनर्वसन विभागाऐवजी आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग असा उल्लेख पत्रव्यवहारात /आदेशात करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२८१६०४३६६३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ABHAY BUDDHADEO YAWALKAR

Digitally signed by ABHAY BUDDHADEO YAWALKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=fc2bd4d86b4ca711a1b14f938076233aee40c5244f5be99ffee58540ac27ce99, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=1d9d4b1ec56c6c724f75426d39191e4de700311954aa4d358b9ae58165bcfa62, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ABHAY BUDDHADEO YAWALKAR
Date: 2019.06.28 16:15:35 +05'30'

(अभय यावलकर)

संचालक, आपत्ती व्यवस्थापन

प्रत:-

१) सर्व मंत्रालयीन विभाग

२) विभागीय आयुक्त (सर्व)

३) जिल्हाधिकारी (सर्व)

४) सर्व महानगरपालिका /नगरपालिका / नगरपरिषद

५) निवडनस्ती.